# अण्णा भाऊ साठे

## व्यक्ती, साहित्य आणि समीक्षा




संपादक

डॉ. राजकुमार मस्के

डॉ. लहू वाघमारे

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth. Dist. Parbhani

युगप्रवर्तक
प्रकाशन

**अण्णा भाऊ साठे : व्यक्ती, साहित्य आणि समीक्षा**
(Anna Bhau Sathe : Vyakti, Sahitya aani Sameeksha)

**संपादक :**
**डॉ. राजकुमार मस्के**
शिवालय, बीदर रेल्वे गेटच्या पूर्वेस, साई नगर, उदगीर, मो.: ९८९०५९६२५५
**डॉ. लहू वाघमारे**, सुभेदार रामजी नगर, लातूर, मो.:९८२३८२७४३८

**प्रकाशक :**

© युगप्रवर्तक प्रकाशन
बाभळगाव, ता. जि. लातूर-४१३ ५३१ भ्र.: ९३७३८५४४१६

**मुद्रण, अक्षरजुळणी :**
विश्व ऑफसेट प्रिंटर्स, बाभळगाव, ता. जि. लातूर-४१३ ५३१
भ्र.: ७०५८८४८६४८

**मुद्रित शोधन :**
डॉ. लहू वाघमारे

**मुखपृष्ठ :** शिवाजी हांडे, ९९६००६५५११

**आवृत्ती पहिली :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, १४ एप्रिल २०१९

**ISBN** : ९७८-८१-९३७४७७-०-४

**मूल्य :** ₹ ६००/-

*प्रस्तुत ग्रंथातील लेखकांच्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

ISBN : 978-81-937477-

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

अ.क्र. लेख / लेखकाचे नाव

१३ अण्णा भाऊंच्या साहित्यातील मूल्याविष्कार ११६-१
डॉ. अनंत राऊत
१४ अण्णा भाऊ साठे यांच्या दोन कथासंग्रहांतील भाषा : एक आकलन १२६-१
डॉ. राजकुमार मस्के
१५ अण्णा भाऊंच्या लोकनाट्यातील नायक १३७-१
डॉ. जयद्रथ जाधव
१६ अण्णा भाऊ साठे यांची वैचारिक दृष्टी १५१-१
पांडुरंग अडसुळे
१७ अण्णा भाऊ साठेंच्या साहित्यातील परिवर्तनवादी दृष्टिकोन आणि आजचे वास्तव १५७-१
डॉ. नारायण तु. कांबळे
१८ आंबेडकरवादी अण्णा भाऊ साठे : मतलबी लोकांनी लपवलेले वास्तव १७४-१
डॉ. सा. द. सोनसळे
१९ स्वातंत्र्याचे पाईक : अण्णा भाऊ साठे १८६-१
प्रा. गौतम गायकवाड
२० लोकशाहीर आणि राष्ट्रसंत : परिवर्तनाचे एकच सूत्र १९६-२
डॉ. माधव जाधव
२१ अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील विद्रोह २०३-२
डॉ. बी. टी. अंभोरे
२२ झुंझार लेखणीचा वाटसरू २०९-२
डॉ. दुष्यंत मनोहर कटारे
२३ जनतेसाठी जगणारा आणि लिहिणारा लेखक : अण्णा भाऊ साठे २१४-२
डॉ. मारोती द. कसाब
२४ अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील आंबेडकरी विचार २२५-२
आरती केशवराव गायकवाड
२५ अण्णा भाऊ साठे आणि वाङ्मयीन भूमिका २३१-२
डॉ. विजयकुमार काशीनाथ करजकर
२६ बंदिस्त लोकशाहीर अण्णा भाऊ आणि डॉ. बाबासाहेब २३९-२
मच्छिंद्र कांबळे

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth, Dist. Parbhani



# आंबेडकरवादी अण्णा भाऊ साठे : मतलबी लोकांनी लपवलेले वास्तव

डॉ. सा. द. सोनसळे
रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी.

''बुडती हे जन न देखवे डोळा। येतो कळवळा म्हणुनीया।।'' असा तथागत बुद्धांचा विचार संत तुकाराम महाराजांनी मांडला. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे मराठी वाङ्मयातील थोर लेखक, शाहीर, वगनाट्यकार म्हणून संपूर्ण मराठी माणसाला परिचित आहेत. अण्णा भाऊंच्या जीवनाचा आढावा घेत असताना, त्यांच्या जीवनाच्या कालखंडाचे तीन भागांत विभाजन करावे लागेल. पहिला भाग अण्णा भाऊंच्या जन्मापासून मुंबईला पोहचेपर्यंत आणि गिरणीत कामगार म्हणून किंवा कम्युनिस्ट विचारसरणीच्या संपर्कात येईपर्यंतचा; दुसरा भाग मुंबईमध्ये कम्युनिस्ट पार्टीच्या कार्यालयात, 'लालबावटा' कलापथकात काम करतानाचा आणि तिसरा भाग हा आंबेडकरी क्रांतिचळवळीवर मनापासून प्रेम करत असलेला भाग! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवमुक्ती लढ्याकडे डोळसपणे पाहताना, त्या झुंझार कालखंडाविषयी अण्णा भाऊंना काय वाटते? हा आयुष्याच्या शेवटचा भाग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्य, स्त्रिया, ओ.बी.सी., दुर्बल घटकांच्या मुक्तिलढ्याकडे अण्णा भाऊ साठे आकर्षित झाले. वास्तविक पाहता, काही ढोंगी विचारवंत त्याकडे कानाडोळा करतात. त्या लपवलेल्या वास्तवावर प्रकाश टाकणे अत्यावश्यक आहे.

एखाद्या लोकलढ्यात काम करताना, त्या लोकलढ्याला स्थानिक तत्कालीन अनेक संदर्भ असतात. काही प्रश्न तात्कालिक स्वरूपाचे असतात. त्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी एक गरज म्हणून झालेला सहभाग, तसेच तो सहभागही गरजेपुरताच असतो; परंतु तत्कालीन प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी गरज म्हणून स्वीकारलेल्या कार्याला त्या व्यक्तीच्या संपूर्ण जीवनाचे तत्त्वज्ञान म्हणून समजणे आणि त्यावरून त्या माणसाची समीक्षा करणे, हे पोरकटपणाचे लक्षण आहे. कारण त्या व्यक्तीच्या दुःखाचे मूळ दुसरेच असते. माणसाच्या अंतःवेदना त्या आकर्षित करीत असताना, जो लढा

ISBN : 978-81-937477-0-4

समग्र मुक्तीचा लढा असतो, त्याकडे माणूस शेवटी का होईना जात असतो आणि तेच तर त्यांच्या जीवनाचे अंतिम उद्दिष्ट असते. यात महत्त्वाचे म्हणजे गरज म्हणून सहजपणे स्वीकारलेले कार्य म्हणजे त्याच्या जीवनाचे सारभूत तत्त्वज्ञान होऊ शकत नाही. त्या व्यक्तीला अशा विचारांचे समजून त्यांचा त्या दृष्टीने अभ्यास करणे म्हणजे त्यांच्यावरील अन्याय होय.

याबाबतीत आपण एका वास्तवातील साध्या उदाहरणाकडे पाहू. आज अनेक शिक्षणसंस्थांमधून शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी काम करीत असतात. त्या शिक्षणसंस्थाचालकांची जी विचारधारा असते, त्या विचारधारेचे सर्वच्या सर्व प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी नसतात. जरी ते संस्थेत काम करणारे कर्मचारी असले, तरी ते वेगळ्या विचारधारेचे असू शकतात; त्याची संस्कृती, जीवनाचे तत्त्वज्ञान, वेगळे असू शकते.

अण्णा भाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी वाटेगावात झाला. ते दारिद्र्याने त्रस्त झालेल्या कुटुंबात जगत होते. गावात काम मिळत नसल्यामुळे हताश झालेले भाऊराव साठे कामाच्या शोधात मुंबईला सहकुटुंब निघतात. अनेक अडचणींचा सामना करत ते पायी वाटेगावहून मुंबईला जातात. मुंबईत एका चाळीत राहतात, मिळेल ते काम करतात. एका दूरच्या नात्यातील मामासोबत अण्णा भाऊ डोक्यावर कपडे विकण्याचे काम करतात. कपडे घेऊन पायी फिरताना, दुकानाच्या पाट्या वाचता-वाचता ते वाचायला शिकले. सोबत फिरणाऱ्या मामांनी धर्मग्रंथांच्या वाचनातून शिकवले. अण्णा भाऊ गावाकडे फक्त दीड दिवस शाळेत गेले. त्यांचे खरे शिक्षण समाजाच्या शाळेत झाले. कष्ट उपसताना अनेक ठिकाणी अण्णा भाऊंना काम करावे लागले. मजुरीचे काम शोधताना त्यांची एका मुकादमासोबत ओळख झाली. अण्णा भाऊ गिरणी आणि कारखान्यातून काम करत असताना, सोबत असलेले मजूर कोणत्या विचाराने भारावलेले असतात, हे काही त्यांना माहीत नव्हते. हे सर्वच मजूर मार्क्सच्या तत्त्वज्ञानाने भारावले नव्हते. त्यांना केवळ चरितार्थ चालविणे एवढेच माहीत होते. जे मजुरांचे नेते म्हणून संघटना बांधतात, त्यांनीच एखादी विचारधारा स्वीकारलेली असते. त्यात राजकारणाचाही भाग असतो. हुशार माणसांना राजकारणी शोधत असतात. एखादा राबणारा अनुयायी दिसला की, त्याचा वापर करून घेत असतात. स्वत:च्या पक्षासाठी, संघटनेसाठी त्या हुशार माणसांचा, त्यांच्या उमेदीच्या कालखंडात वापर करून घेतला जातो आणि इप्सित साध्य झाले की, त्याला दाबून ठेवले जाते. तो हुशार अनुयायी नेतृत्त्व करू इच्छित असेल, तर त्याचे राजकीय शिरकाण केले जाते. त्या माणसाला ऐन संधीच्या वेळी डावलले जाते. या देशात

 ISBN : 978-81-937477-0-4

सवर्णांना, अस्पृश्य, आदिवासी, भटके, ओ.बी.सी., स्त्रिया हे नेतृत्त्वाच्या मुख्यस्थानी गेलेले चालत नाही. त्यांनी फक्त अनुयायी म्हणून आदेश ऐकायचे असतात. अण्णा भाऊ साठेंसोबत सवर्ण नेत्यांनी हाच व्यवहार केला. तो सर्वांना ज्ञात आहे.

आपल्या देशात सवर्णांचा माणूस भुकेकंगाल, भिकारी असला, तरी तो देवांच्या रूपात भीक मागतो आणि अहोरात्र कष्ट उपसून अस्पृश्यांचा गुलाम, गुलाम माणूस लाचारीने मजुरीची भीक मागतो आणि सवर्णांचे मालक 'द्या सहानुभूती' म्हणून मजुरीचा मोबदला भीक दिल्यासारखा देतात. या आर्थिक गुलामगिरीला या देशाचा विषमताप्रधान धर्म आणि त्या धर्माची धर्मव्यवस्थाच कारणीभूत आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''जो धर्म एकाला धन, संपत्ती साठविण्याचा अधिकार देतो आणि दुसऱ्याला निर्धन ठेवतो, तो धर्म, धर्म नसून, ती शिक्षा आहे.''[१] अशी शिक्षा अण्णा भाऊंना आणि त्यांच्या आधीच्या हजारो पिढ्यांना झाली होती. ज्या मातंग जातीत अण्णा भाऊंचा जन्म झाला, ती जात अण्णा भाऊंना आयुष्यभर चिकटून राहिली; ते 'लाल बावट्या'च्या कलापथकात गेल्यावरही धुवून निघाली नाही. कम्युनिस्ट पक्षाने आणि मार्क्सवादी लोकांनी अण्णा भाऊंना जातिअंताच्या लढाईपासून दूर ठेवण्याची अत्यंत हुशारीने काळजी घेतली. तसे करण्यात कम्युनिस्टांचा राजकीय हेतू होता; परंतु अण्णा भाऊंनी आपल्या आयुष्याच्या तत्त्वज्ञानाची घुसळण करून आयुष्याच्या शेवटी कोणता विचार स्वीकारला? याला फार महत्त्व आहे.

अण्णा भाऊ मुंबईत मोरबागला कामगार म्हणून काम करतानाचा एक प्रसंग चंद्रकांत वानखेडे यांनी 'साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे' या ग्रंथात चित्रित केला आहे. ''मोरबाग गिरणी तेथून फार लांब होती, तरी त्या कामावर जाऊ लागले. त्यानंतर त्यांची नेमणूक तार खात्यात झाली. त्यानंतर ते त्रासन खात्यात काम करू लागले. या ठिकाणी त्यांना तुटलेले धागे पुन्हा जोडावे लागत होते. ते धागे तोंडातील थुंकी लावून जोडावे लागत. तेथील कामगारांना अण्णा भाऊंची जात माहिती झाली आणि मांगाच्या थुंकीने बाटलेल्या धाग्याला आम्ही हात लावणार नाही, अशी त्यांनी भूमिका घेतल्याने, अण्णा भाऊंना ते काम सोडावे लागले.''[२] असा जातिभेदाचा दहशतवाद अण्णा भाऊंना छळत होता. अशी कामगार चळवळीतील जातीयता होती. मार्क्सवादाचा परिणाम कामगारांवर नव्हता, याचे हे फार मोठे उदाहरण आहे. या घटनेची फार खोल जखम अण्णा भाऊंच्या अंत:करणावर झाली. या जातिभेदावर कम्युनिस्ट नेत्यांनीही काही उपाययोजना केली नाही. केवळ नेते बॅनर, पोस्टरवर चळवळ चालवत होते. प्रत्यक्षातील जातीयता मात्र कायम ठेवली जात होती. जातिभेदाचा असा राक्षस एखाद्या खालच्या जातीच्या माणसाला छळत असताना, मार्क्सचे तत्त्वज्ञान सांगणारे

कॉम्रेड नेते कामगारांच्या चळवळीत प्रबोधनाचे कार्य करताना गप्प कसे होते? अण्णा भाऊंना अस्पृश्यांच्या गलिच्छ वस्तीमध्ये राहावे लागले.

'लालबावटा' कलापथकात काम करताना, गिरणीच्या कामाला जायला वेळ मिळत नव्हता. कलापथकाचे काम आटोपून घरी आले की, त्यांची पत्नी कोंडाबाई त्यांना विचारायची- स्वयंपाक कशाचा करू, खाण्यासाठी काही धान्य, सामान आणले आहे काय? ज्या कलापथकात ते तळमळीने काम करत होते, त्या चळवळीत अण्णा भाऊंच्या दारिद्र्यावर कायम इलाज शोधला नाही. मग याचा परिणाम असा झाला की, कोंडाबाई आपल्या छोट्या मधुकरला घेऊन गावाकडे जातात. 'लालबावटा' कलापथकात प्रबोधनाचे कार्य करताना अण्णा भाऊंच्या संसाराची ताटातूट झाली. वर्णव्यवस्थेने वाट्याला घातलेले दारिद्र्य 'लालबावट्या'च्या कालापथकात राहूनही दूर होऊ शकले नाही. कारण या देशातील प्रस्थापित जातीयवाद्यांना तशी सवय नाही. कम्युनिस्ट नेत्यांनी मनावर घेतले असते, तर अण्णा भाऊंना मुंबईतच कायमचे उत्पन्नाचे साधन निर्माण करून देऊ शकले असते. त्यामुळे अण्णा भाऊंच्या संसाराची ताटातूटही झाली नसती आणि दुसरे असे की, अण्णा भाऊंसारखा पहाडी आवाजाचा शाहीर, कलावंत, एक मोठा लेखक मुंबईमध्ये उभा राहू शकला असता; परंतु या देशातील धर्मव्यवस्थेने अण्णा भाऊंना गावकुसाच्या बाहेरचीच वागणूक मुंबईमध्येही दिली, हेच तर जातीय भेदाचे जुनाट दुखणे होते, जे पाठ सोडत नाही. त्यावर साम्यवादी, समाजवादी किंवा गांधीवादी मलमपट्टी उपयोगाची नाही. या विचारधारा आपल्या देशात केवळ तत्त्वज्ञान सांगतात, प्रत्यक्षात अंमलबजावणी करत नाहीत. कारण हे तत्त्वज्ञान सांगणारे वर्णवादी, जातिव्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या जातकुळीतले असतात.

तरीही अण्णा भाऊ कामगारांच्या हितासाठी तुरुंगात जातात, तुरुंगवास भोगतात. कामगारक्रांती झाली त्या रशियाला जातात. तिथे ते मास्को, लेनिनग्राड, स्टॅलिनग्राड, बांकू, अजारबैजान, खार्कोव्ह आणि ताश्कंद या ठिकाणांना भेटी देतात. त्या भेटीत त्यांनी तेथील उद्योगी, जातिविरहीत विनयशील समाज पाहिला आणि ते भारावून गेले. मायदेशी परतल्यावर त्यांनी शोषणाविरोधी अनेक कथा-कादंबऱ्या, वगनाट्ये, शाहिरी लावण्या लिहिल्या, ज्यांमधून जातीचे दुःख, दुबळ्या माणसांचे दुःख प्रकर्षाने मांडले. १९४० ते १९५४ हा चौदा वर्षांचा कालखंड आहे. या कालखंडात अण्णा भाऊ 'लालबावट्या'च्या कलापथकात शाहिरी प्रबोधनाचे कार्यक्रम करू लागले. त्या कार्याकडे ते जीवनध्येय म्हणून पाहू लागले की, गरज म्हणून पाहू लागले? हाच मूळात मूलगामी चिंतनाचा मुद्दा आहे. कमालीचे दारिद्र्य आणि भूकेची आग छळत

 ISBN : 978-81-937477-0-4

असताना त्यावर उपाय म्हणून स्वीकारलेले कार्य अण्णा भाऊंचे जीवनाचे अंतिम उद्दिष्ट कसे काय असू शकेल? एखादा अण्णा भाऊ साठेंसारखा तरूण कामाच्या शोधात असताना त्यांना काम मिळाले. ज्या मजुरांमध्ये जात न विसरलेले हिंदू मजूर आहेत. एक अंतिम सत्य हे आहे की, कोणताही हिंदू माणूस आपली जात विसरत नाही, तसेच तो दुसऱ्याचीही जात विसरू देत नाही. कारण त्याचा जन्मच गर्भाला चिकटवलेल्या जातीपासून झालेला असतो. जन्माच्या आधीच बाळाची जात निश्चित होत असते, असा हा कमालीचा आपला देश आहे.

अण्णा भाऊंच्या दारिद्र्यवाढीला मुंबईमध्ये 'लालबावटा' कलापथकही जबाबदार आहे. त्याचे कारण चंद्रकांत वानखेडे सांगतात, ''अण्णा भाऊ साठे यांचे पार्टीकार्यात एवढे लक्ष लागले की, ते सदासर्वदा लाल बावटा कलापथकाचेच कार्य सांभाळू लागले. पुन्हा गिरणीत त्यांचे लक्ष लागेना. पार्टीच्या कार्यक्रमात जी काही रक्कम मिळायची, त्यावर ते आपला घरखर्च भागवू लागले.''[३] यावरून असे अनुमान काढावयास वाव आहे की, घरात प्रचंड दारिद्र्य आहे आणि 'लालबावटा' कलापथकात मिळणाऱ्या तुटपुंज्या रकमेवर अण्णा भाऊ गुजराण करू लागले. गिरणीतील काम सोडल्यावर हाच एक पर्याय त्यांच्यासमोर असावा, असे वाटते. दारिद्र्याचे चटके भोगणारा अण्णा भाऊंचा देह वर्णवाद्यांच्या, जातीयवाद्यांच्या दृष्टीने अस्पृश्यच आहे. अस्पृश्यांच्या दारिद्र्याला आर्थिक विषमता कारणीभूत आहे. ही आर्थिक विषमता वर्णभेदाच्या खोल तळाशी ठाण मांडून आहे. तिचे स्थान अढळ आहे. तिच्या गर्भावर पोसलेली जातीयता संधीची समानता नाकारते. परिणामी, नीच जातीच्या लोकांना रोजगाराची संधी दिली जात नाही. त्यांनी त्याच दारिद्र्यात राहावे, असे पुराणे आणि धर्मग्रंथ सांगतात. त्या अस्पृश्यतेच्या घाणीत राहणे म्हणजेच त्यांनी त्यांच्या पायरीने वागणे होय. त्या पायऱ्या उद्ध्वस्त केल्याशिवाय खालचे वर आणि वरचे खाली कसे येणार? जो जातीय भेदाचा सैतान डॉ. बाबासाहेबांच्या मानगुटीवर बसला होता, तसाच सैतान अण्णा भाऊ साठेंसह तमाम अस्पृश्यांच्या मानगुटीवर बसलेला होता. त्याचा मुडदा पाडायचा असेल, तर डॉ. बाबासाहेबांची झुंझार लेखणीच ते कार्य करू शकते.

कार्ल मार्क्सच्या मतानुसार, 'धर्म ही अफूची गोळी आहे. तो घेतलेला माणूस गुंग होतो.' या विचारामुळे धर्मापासून दूर रहा, असाच संदेश कार्ल मार्क्स देतो; परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, माणसाला नीतिमान धर्माची म्हणजेच बुद्धिवादी विचारांची, नैतिकता शिकविणाऱ्या, शीलसंपन्न धम्माची आवश्यकता आहे. आपल्या देशातील कोणताही माणूस निधर्मी असू शकत नाही. देशाचेच काय, जगात असा

माणूस मिळणे विरळाच. प्राप्त परिस्थितीत मातंग (मांग) ही जात आपल्या बारा पोटजातींसह ती वैदिकांच्या वर्णाश्रित हिंदू धर्मातील जात आहे. 'मांग' या शब्दाचा शब्दकोषातील अर्थ आहे- 'मांग म्हणजे फाशी देणारा किंवा खून करणारा.' मातंग समाजाला हिंदू धर्माने सांगितलेली कमी-अधिक प्रमाणात कामे आजही ग्रामीण भागात करावी लागतात. कारण हिंदूंची हुकूमत अस्पृश्य जातींवर आहे. ज्या अस्पृश्य जाती धर्मांतरीत झाल्या, त्या मुक्त झाल्या आहेत. ज्या जाती हिंदू धर्मात आहेत, त्यांच्यावर होत असलेला जुलूम, आर्थिक शोषण होत आहे. त्या शोषणाच्या विरोधात भारतात सांघिक प्रयत्न होऊ शकत नाहीत. कारण कृषिप्रधान देशात भूमिहीन शेतमजूर विखुरलेला तर आहेच; परंतु तो वेगवेगळ्या जाती-पोटजातींत विभागला आहे. येथील शोषणाविरुद्धच्या लढाया जातीय रंग, धार्मिक स्तरातील मजूर जातीपातीवरून श्रेष्ठ-कनिष्ठत्त्वाची भावना कसोशीने बाळगतात; परंतु मार्क्सचे विचार पुढीलप्रमाणे आहेत. 'भांडवलदारांची सत्ता संपविण्यासाठी कामगारांनी एकत्र यावे.' हे विचार हिताचे आहेत, प्रामाणिक आहेत, क्रांतिकारक आहेत, याबद्दल दुमत नाही. मात्र हे विचार भारतीय हिंदू समाजव्यवस्थेचा विचार करता, स्वप्नवत आहेत. ते प्रत्यक्षात येऊ शकत नाहीत. जातीयता मजूर-गुलामांना एकत्र येऊ देत नाही. अण्णा भाऊंचा वर्ग पाहण्यापेक्षा त्यांच्या जातीचा शोध घेतला जातो आणि त्यावरून श्रेणी ठरविली जाते.

क्रांतिबा फुले ज्या काळात शोषणाविरोधी विचार मांडत होते, त्याच काळात मार्क्स तिकडे विचार मांडत होता. मग जोतिबा फुलेंचेच विचार इथे मजुरांचे प्रेरणास्थान का होत नाहीत? त्याचे सोपे उत्तर आहे, जोतीराव फुले वर्णव्यवस्थेच्या आणि जातिव्यवस्थेच्या विरोधात दंड थोपडतात. येथील मार्क्सवादी जाती सांभाळून आहेत. त्यांनी जातिधर्म सोडलेला नाही. त्यामुळे वर्णव्यवस्थेला चूड लावणारा फुलेअंगार कसा परवडणार? धर्मग्रंथांची चिकित्सा करणारा आणि "विद्वान शूद्रांनो जागे कारे व्हाना। तपासोनी पहाना ब्रम्हघोळ।"[४] असे विचार चेतविणारे फुले मार्क्सवाद्यांच्या अडचणींचे आहेत. मातंग समाज क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांना फुल्यांच्या गुरूस्थानी बसवतो; परंतु फुल्यांना मात्र आपले समजत नाही. फुल्यांची प्रेरणा मानली असती, तर मार्क्सची कास धरण्याची गरजच राहिली नसती. जोतीराव फुले स्वीकारल्याने माणूस एकाच वेळी सामाजिक-आर्थिक क्रांतीची भाषा बोलतो आणि हा विचार स्वीकारलेला माणूस आंबेडकरवादाकडे वळतो. आपसूकच तो तथागत बुद्धांकडे जावून बुद्धिवादी होतो. हेच तर हिंदुत्त्ववादी विचारवंतांची डोकेदुखी आहे. अण्णा भाऊ साठेंना मार्क्सवादी असल्याचे पद्धतशीर मांडले की, मातंग समाज

 ISBN : 978-81-937477-0-4

मार्क्सवादाकडे वळेल. हा समाज मार्क्सवादी झाला की, तो फक्त आर्थिक प्रश्नाला महत्त्व देईल आर्थिक प्रश्न पोट भरण्याचा विचार सांगत असतो. जातिअंताच्या लढाईला तो साहजिकच बगल देईल आणि इथेच तो स्वाभिमान, आत्मसन्मान विसरेल. जात कायम ठेवण्यासाठी असे काम केले जाते. मग प्रस्थापित व्यवस्थेचे रखवालदार अण्णा भाऊंना मार्क्सवादी करण्याचा खटाटोप करत आहेत.

हिंदूधर्मात मातंग समाजाचे स्थान कोणत्या ठिकाणी आहे. तर आपणास असे दिसेल की, मांग ही जात अस्पृश्यांच्या शेकडो जातींपैकी एक आहे. ती वर्णांकित नाही, जातिबहिष्कृत अस्पृश्य आहे. शब्दकोषातील 'मांग' शब्दाचा आपण अर्थ पाहिला. या समाजाला सन्मान मिळावा, असे आंबेडकरवाद गर्जून सांगतो आहे; परंतु कोत्या मनाचे बुद्धिवादी या समाजाला सन्मान मिळूच नये, त्याने बुद्धिवादी म्हणून जगूच नये, म्हणून मार्क्सवाद सांगताना हळूच आंबेडकरवादाबद्दल विष पेरत असतात. 'मांग' जातीला हिंदूत ठेवून, तिचे नामकरण 'मातंग' केल्याने जातीयवाद्यांनी हजारो वर्षांपासून केलेली बेइज्जती कमी होत नाही! आणि म्हणूनच मातंग समाजातील स्वाभिमानी तरूण आंबेडकरवादाची भाषा बोलत आहेत. कारण आंबेडकरवाद पोटभरू लोकांचा तांडा नाही, तो स्वाभिमान शिकवतो.

अण्णा भाऊ साठे यांच्या मनातील घुसमट काय होती? हेही तपासणे गरजेचे आहे. त्यांना कम्युनिस्ट पक्षात शेवटी वागणूक कशी मिळत होती? त्यांचे मन आयुष्यभर का रमले नाही तिथे? जे असह्य होते, त्याला, त्या विचारसरणीला, जीवनतत्त्वज्ञान म्हणता येईल काय? आयुष्याच्या प्रगल्भावस्थेत जे तत्त्वज्ञान माणूस नाकारतो आणि जे योग्य आहे तेच स्वीकारतो. काही काळ एखाद्या पक्षसंघटनेत काम केल्यानंतर नैराश्य येण्याचे कारण काय असेल? अण्णा भाऊ 'लालबावट्या'च्या कलापथकात, कम्युनिस्ट विचारसरणीपेक्षा आंबेडकरवादाकडे का वळले? याबद्दल चंद्रकांत वानखेडे म्हणतात, ''यानंतर लालबावटा कलापथकातही फाटाफुटी झाली. अमरशेखांनी आपले वेगळे कलापथक सुरू केले. गव्हाणकर आजारामुळे गावाकडे निघून गेले आणि मग त्या कलापथकाचे बारा वाजले. ते मोडकळीस आले. अण्णा भाऊंचे कम्युनिस्ट पार्टीतील कार्य मंदावले.''[१] अशा परिस्थितीत अण्णा भाऊसुद्धा या कार्यापासून विरक्त होऊ लागले. याच काळात कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांनी अण्णा भाऊंना एकाकी पाडण्याचा प्रयत्न केला. अण्णा भाऊंसोबत राहत असलेल्या जयवंताबाईची मुलगी शांता हिला पत्र देवून, तिला अमरशेखाच्या कलापथकात काम करण्यास सांगितले. हे अण्णा भाऊंना मान्य नव्हते. या घटनेवरून वाद वाढला. जयवंताबाई गोरेगावातील हाऊसिंग बोर्डाच्या चाळीत राहायला गेली आणि अण्णा

भाऊ पुन्हा एकाकी पडले. ह्या वेदना त्यांनी भोगल्या, हे आपणास ज्ञात आहे. अण्णा भाऊ साठे यांचे कलासक्त मन भारतातील जातीय अंताची लढाई लढत असलेल्या आंबेडकरी चळवळीकडे वळले. याचा असा अर्थ नाही की, अण्णा भाऊंना आजपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ माहिती नव्हती. या चळवळीबद्दल अगदी सुरुवातीपासूनच ते जाणून होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीशी अण्णा भाऊंचे नाते अगदी नैसर्गिक स्वरूपाचे आहे. कारण अण्णा भाऊंचे अनेक नातेवाईक, मातंग समाजातील त्या काळातील विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, नेते, आंबेडकरी चळवळीत बाबासाहेबांसोबत काम करीत होते. हेही अण्णा भाऊंना माहीत होते. कारण त्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महार-मांग-ढोर, भंगी या समाजाच्या उत्थानासाठी वेगवेगळ्या परिषदा घेत होते. १९३५ ला बाबासाहेबांनी धर्मांतराची घोषणा केली होती. त्यामुळे हिंदूधर्माचा वटवृक्ष मूळासह हादरला होता. अस्पृश्यांना दूर हो म्हणणारे बाबासाहेबांची मनधरणी करत होते. आपल्या अपराधाचा पाढा वाचत होते. दुसरीकडे अस्पृश्य बांधव आनंदी झाले होते. धर्मांतराच्या सिंहगर्जनेला मातंग बांधवांनी जाहीर पाठिंबा देण्यासाठी दि. २ जून १९३५ रोजी 'मुंबई इलाखा मातंग परिषद' घेण्यात आली. त्यात अनेक ठराव पास केले. त्यातील पहिले दोन ठराव पुढीलप्रमाणे होते. ''ठराव १ (अ) ही अखिल मुंबई इलाखा मातंग परिषद पूर्ण विचारांती असे ठरविते की, समता आणि स्वातंत्र्य मिळविण्यासाठी मातंग समाजाला धर्मांतर केल्याशिवाय उपाय नाही. (ब) ही परिषद असे जाहीर करते की, अखिल अस्पृश्यांचे एकमेव पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेवर मातंग समजाचा पूर्ण विश्वास असून, त्यांचेबरोबर मातंग समाज सामुदायिकरित्या धर्मांतर करण्यास तयार आहे.''[६] हा विश्वास व्यक्त करीत असताना बाबासाहेब आंबेडकर हेसुद्धा मातंग समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतात. मातंग समाजासोबत दुजाभाव ठेवणाऱ्या महारांना खडे बोल सुनावताना ते पुण्यातील अहिल्याश्रमात झालेल्या 'महाराष्ट्रीय अस्पृश्य तरुण परिषदे'त दि. ११, १२ जानेवारी १९३६ ला बाबासाहेब म्हणतात, ''महाराष्ट्रात तरी अस्पृश्य समाजात महारांची संख्या अधिक आहे. तेव्हा अल्पसंख्याकांची जशी नेहमीच कुचंबणा होते, तशी आपल्या मांग व भंगी बंधूंची होत आहे. हे त्यांनी ध्यानी आणून अस्पृश्यातील हा उच्च-नीच भाव एकदम नष्ट करावा. मांग व भंगी समाजाला माझे आश्वासन आहे की, ज्यावेळी महार तुम्हास समानतेने वागविणार नाहीत, त्यावेळी मी तुमचा आहे. तुमच्या वतीने तुमचे भांडण मी महारांशी भांडेन.''[७] दि. १८ जुलै १९३६ रोजी मातंग समाजाने बाबासाहेबांच्या धर्मांतराला पाठिंबा दिला होता, तर २९/१२/१९३६ रोजी पत्रक काढून धर्मांतराला पाठिंबा दिला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मातंग

 ISBN : 978-81-937477-0-4

समाजाला जगजाहीर सांगतात. त्यावरून त्यांच्यावर संकुचितपणाचे आरोप होतात, ते चुकीचे आहेत. मातंग समाजाचे लोक बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या विचाराला पाठिंबा देतात आणि बाबासाहेबसुद्धा मातंग समाजाची कड घेतात. त्याप्रमाणे मातंग समाजाबद्दल गांधीजींनी, समाजवादी विचारवंतांनी किंवा मार्क्सवादी विचारवंतांनी कुठेही अशा भावना व्यक्त केल्या नाहीत. तसे मातंग समाजानेही गांधीच्या, मार्क्सच्या विचारांना कुठेही जाहीर पाठिंबा दिला नाही, हे लपवून ठेवलेले वास्तव आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मातंग समाजात जागृती निर्माण करण्यासाठी कर्कम येथे दि. ३१/१२/१९३६ मध्ये एक परिषद घेतली, तर अशीच परिषद दि. ०६/१२/१९३९ रोजी भव्य मातंग परिषद घेतली. उस्मानाबाद जिल्ह्यातील तडवळे (क.) येथे दि. २३/०२/१९४१ रोजी 'महार-मांग वतन परिषद' घेतली. या परिषदेत सहभागी झालेले सोनवणे, भगवान भालेराव, सोपान वाघमारे हे मातंग होते. त्यांनी धर्मांतराला पाठिंबा देऊन त्यांचे नेतृत्त्व स्वीकारले होते. यासंदर्भात मातंग समाजाने बाबासाहेबांसोबत धर्मांतर केले होते. ह्याबद्दल डॉ. सुरेश वाघमारे 'आंबेडकरी चळवळ व मातंग समाज' या लेखात म्हणतात, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केल्यानंतर अनेक मातंग कार्यकर्त्यांनी धर्मांतर केले होते. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.''[८] धर्मांतरात मातंग बांधवांचा समावेश होता, हे डॉ. वाघमारेंनी पुराव्यासह सांगितले आहे. डॉ. बाबासाहेब जर अजून पाच वर्षे जगले असते, तर मातंग, चर्मकार, ढोर, भंगी या अस्पृश्य समाजासह मराठा आणि ओ.बी.सी. धर्मांतरीत झालेले दिसले असते. बाबासाहेबांच्या नंतर त्या ताकदीचा नेता झाला नाही आणि समाजातील जुन्या विचारांच्या लोकांनी गावपातळीवरील महार-मांग जातीतील तेढ चळवळीत आणले. त्याचा परिणाम मातंग, चर्मकार जाती ह्या हिंदू राहिल्या. वास्तविक या जातींना हिंदू तरी कसे म्हणावे? कारण हिंदू होण्यासाठी जी ब्राह्मणांची मौंजविधी केल्या जाते, तशी मौंजविधी मातंग, चर्मकार, ढोर यांची होत नाही. मग हे कोण आहेत? ते संशोधनाचा मुद्दा आहे.

व्यक्तिगत स्वार्थापायी काही मातंग, महार समाजातील तथाकथित विद्वान आणि प्रस्थापित व्यवस्थेचे रखवालदार अण्णा भाऊंना मार्क्सवादी म्हणतात. परिणामी, अण्णा भाऊंना मानणारा मातंग समाज हिंदूंच्या मानसिक गुलामगिरीत ठेवायवा असतो आणि दुसरे असे की, कम्युनिस्ट पक्षाला ओव्हरटेक करून पुढे जाणाऱ्या रिपब्लिकन पक्षाला नेस्तनाबूत करावयाचे असते. हा दुहेरी हेतू यामागे होता, आजही आहे.

१९४२ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजूरमंत्री होते. मुंबईसह संपूर्ण भारतात बाबासाहेब कामगारांचे प्रचंड कार्य करताना अण्णा भाऊ साठे पाहत होते. कामगारांच्या कामाचे आठ तास करणे, महिला कामगारांना बाळंतपणाची पगारी सुट्टी

देणे, नुकसानभरपाई देणे यांसारख्या असंख्य योजना बाबासाहेब राबवत होते. या कार्याचा अण्णा भाऊंवर किंचितही परिणाम झाला नसेल काय? याच काळात आंबेडकरी जलशात काम करणारे अनेक शाहीर, कलावंत उदा. शंकर पगारेसारखे शाहीर अण्णा भाऊंसोबत होते. आंबेडकरी जलसा करणारे कलावंत 'लालबावटा' कलापथकातही होते. एकंदर तो कामगारांचे आत्मभान जागृत करणारा कालखंड होता आणि म्हणून आंबेडकरकालीन कामगारचळवळ ही कम्युनिस्टांचीच चळवळ होती, असे मानणे अंधपणाचे होईल. कामगारांच्या प्रश्नांवर आंबेडकरी चळवळही काम करीत होती. कामगारचळवळीत काम करणाऱ्या अण्णा भाऊंना आपण आंबेडकरी चळवळीचेच काम करत आहोत, असेही वाटत असावे. अण्णा भाऊ साठे यांनी अस्पृश्यांच्या, उपेक्षितांच्या, असह्य माणसांच्या जीवनावर कथा-कादंबऱ्या, वगनाट्य लिहिले; परंतु खेदाची बाब अशी की, राज्यकर्त्यांच्या प्रथेप्रमाणे त्या साहित्याला राज्यकर्त्यांनी वाचलेच नाही. काहींनी वाचून अस्पृश्यांबद्दल केवळ सहानुभूती प्रकट केली. उपाय काही निघत नव्हता. यामुळे अण्णा भाऊंच्या पदरी निराशा पडली. बाबासाहेबांनी तर सवर्णांची सहानुभूती नाकारली आहे. केवळ सहानुभूतीने अस्पृश्य समाजाच्या जीवनात कसलाही फरक पडत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

इ. स. १९५४ पर्यंत अण्णा भाऊंची मानसिकता मार्क्सवादी असावी; परंतु त्यांना कळून चुकले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशिवाय या देशात अस्पृश्यांना पर्याय नाही आणि बाबासाहेबसुद्धा मार्क्सचे विचार नाकारतात. ते म्हणतात, "कम्युनिझमला आज ह्या देशात जागा देण्यास मी तयार नाही. कदाचित पंडित नेहरूंच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील घोडचुकांमुळे कम्युनिझम हा येईलही आणि चीन व रशिया ह्यांच्या नियंत्रणाखाली हा देश जाऊन ह्या देशाचे स्वातंत्र्य लयास जाईल."[९] बाबासाहेबांना या देशाचे स्वातंत्र्य महत्त्वाचे वाटत होते. कारण स्वतंत्र भारताने प्रजासत्ताक, लोकशाही समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था स्वीकारली होती. शेकडो वर्षांनंतर भारताने लोकशाही स्वीकारली होती. त्यासाठी हे स्वातंत्र्य टिकले पाहिजे. यासंदर्भात ते संपूर्ण भारतीय स्वातंत्र्याची चिंता वाहताना म्हणतात, "आपण आपल्या देशाचे स्वातंत्र्य टिकविले पाहिजे. स्वातंत्र्य टिकवून आपणास आपला देश समृद्ध राखावयाचा आहे. कम्युनिझमला ह्या देशात थारा दिला, तर आपले स्वातंत्र्य रसातळाला जाईल. आपला देश रशियाचा अंकित होऊन राहिल. पूर्व युरोपातील राष्ट्रांचा अनुभव आपणास हेच सांगत आहे. आज आपल्या देशापुढे जे मोठे-मोठे महत्त्वाचे प्रश्न आहेत, ते आपले स्वातंत्र्य गमावून आपण सोडवू शकणार नाही. देशाच्या स्वातंत्र्याची राखरांगोळी कम्युनिझममुळे होणार, हे आपण दृष्टिआड करू शकत नाही."[१०] सत्तेवर येणाऱ्या कोणत्याही पक्षाला जनतेच्या सर्वांगीण हितासाठी जोतिबा फुले यांचे धोरण आणि लोकशाहीवादी तत्त्वज्ञान घेऊनच पुढे जावे लागेल. या

 ISBN : 978-81-937477-0-4

भाषणात वरील विचार बाबासाहेबांनी अभिव्यक्त केले आहेत. हे विचार व्यक्त करताना भारताच्या स्वातंत्र्याला कम्युनिझमपासून किती धोका आहे, हे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे. लोकशाही समाजव्यवस्था नाकारली, तर भारतात पुन्हा राजेशाही आणि हुकूमशाही येईल, ही भीतीही बाबासाहेबांना वाटत होती.

अण्णा भाऊ साठेंवर बाबासाहेब आंबेडकरांच्या बुद्धधम्म स्वीकाराचा फार मोठा परिणाम झाला. चंद्रकांत वानखेडे लिहितात, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाला १९५६ ला बौद्ध धम्मदीक्षा देऊन तथाकथित अस्पृश्यवर्गात क्रांती घडवून आणली होती आणि या अभूतपूर्व घटनेने अण्णा भाऊ फारच प्रभावित झाले होते. तशी पावती अमरशेखांनी वगनाट्याच्या पुस्तकाला प्रस्तावना देताना आवर्जून दिलेली आहे. अमरशेख म्हणतात, 'धर्मांतराच्या घटनेने प्रभावित होऊनच अण्णा भाऊ साठे यांनी या वगनाट्यात 'फकड्या' या नायकाच्या तोंडी जे गीत टाकले ते गीत म्हणजे- 'जग बदल घालूनी घाव। मज सांगून गेले भीमराव' हे होय.''[११] या देशाचे मूळ दुखणे तथागत बुद्ध, संत कबीर, जोतिबा फुलेंनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कळाले होते. भारतीय समाजाचा आजार देशी आहे. त्यामुळे त्यावर तथागत बुद्धांनी दिलेली औषधीच उपयोगी पडेल. त्या दुखण्यावर विदेशी औषधी उपयोगी पडणार नाही. कारण विदेशी विचारवंतांना या देशातील जातीयता माहीत नसते. त्यामुळे त्यांची मात्रा लागू पडत नाही. म्हणून जातिभेदाच्या व्याधीला मार्क्सवाद तोकडा पडतो. मार्क्सवादाचा ड्रेस भारतीय समाजाला थिटा होतो, हे विद्वान लोकांनी लक्षात घ्यावे. अण्णा भाऊ आयुष्याच्या शेवटच्या दिवसांत आंबेडकरी विचारांकडे वळले होते. हे त्यांनी लिहिलेल्या असंख्य कथा, कादंबऱ्या, वगनाट्यांवरून, शाहिरीवरून लक्षात येते. उदा. 'मंगला', 'गुलाम', 'मास्तर', 'माकडीचा माळ', 'चिखलातील कमळ', 'वैजयंता', 'आघात', 'वारणेचा वाघ', 'फकिरा' या कादंबऱ्यातून वर्ण आणि जातीय संघर्ष आहे. तर आंबेडकरवाद मांडणारी 'फकिरा' ही कादंबरी चिकित्सकपणे वाचली, तर त्यात आंबेडकरवाद काठोकाठ भरलेला आहे. आंबेडकरवादी कथा 'स्मशानातील सोनं', 'थड्यातील हाडं', 'उपकाराची फेड', 'सोन्याचा मणी', 'बुद्धाची शपथ', 'रामाची सीता', 'राम-रावण युद्ध', 'बरबाद्या कंजारी', 'कोंबडी चोर' अशा असंख्य कथांतून बाबासाहेबांचा विचार मांडला आहे. अण्णा भाऊंनी आंबेडकरवादी नायक कथा, कादंबऱ्यांतून चित्रित केले. अन्याय, जुलूम नाकारणारे नायक समर्थपणे उभे केले. म्हणूनच अण्णा भाऊ म्हणायचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या हातात समाजक्रांतीच्या मशाली दिल्या आहेत. त्या सर्वांना मला सांगायचे आहे. आपणा सर्वांना हे जग बदलायचे आहे.' नमुन्यादाखल 'फकिरा' या कादंबरीचे उदाहरण घेऊ- ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंझार लेखणीला अर्पण केली आहे. माझ्या माहितीप्रमाणे अक्षर वाङ्मयातील हे सर्वश्रेष्ठ उदाहरण आहे. यात

आंधळेपणा बिलकुल नाही. त्यांनी एकही कादंबरी किंवा कथासंग्रह मार्क्सला अर्पण केला नाही. या कादंबरीत एका पात्राच्या तोंडी एक वाक्य आहे, 'शंभर वर्ष शेळी होऊन जगण्यापरीस एक दिवस वाघ व्हवून जगावं.' हे वाक्य बाबासाहेबांचे आहे. दुसरे असे की, या कादंबरीचा नायक 'फकिरा'च्या वडिलांचा खूनी बापू खोत जोगणी घेऊन पळत असताना त्याला अडवून ज्या हातात जोगणी आहे, तो हात तोडतो; परंतु त्याला जीवानिशी ठार मारत नाही. हा तथागत बुद्धांचा विचार आहे. माणसातील वाईटपण काढून त्याला जगण्याची संधी द्यावी, हा हुबेहुब बुद्धविचार अण्णा भाऊंनी समर्थपणे मांडला आहे. त्यांना 'फकिरा'करवी बापू खोताला ठारही मारता आले असते; परंतु त्यांची लेखणी बुद्धविचाराने प्रभावित झाली होती. आणि म्हणूनच ते अहमदपूरच्या सभेत म्हणाले होते, 'डॉ. आंबेडकर हे माझे नेते आहेत.' बाबासाहेबांवर त्यांची अपार श्रद्धा जडली होती. म्हणून बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणाच्या वेळी आपल्या संस्कारक्षम मनाने आदरांजली अण्णा भाऊंनी वाहिली. 'जग बदल घालूनी घाव मज सांगून गेले भीमराव' हाच विचार महत्त्वाचा वाटतो. आयुष्याचे सर्व अनुभव घेऊन अण्णा भाऊंचे जग बदलण्याचे स्वप्न आपण लक्षात घेतले पाहिजे. इतरांच्या विचारांनी हे जग बदलू शकत नाही, हा अण्णा भाऊंचा ठाम विश्वास होता. नाही तर, शिकारी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनासुद्धा मार्क्सवादी करत आहेत. आपण या महामानवांना त्यांची शिकार होण्यापासून वाचविले पाहिजे.

**संदर्भ :**


१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : 'लेखण आणि भाषणे', खंड-१८, भाग-१, १९२० ते १९३६, महाराष्ट्र शासन, प्र.आ. २००२, पृ. ४८८.
२. वानखेडे चंद्रकांत : 'साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे', संकेत प्रकाशन, प्र.आ. २०१३, पृ. २०.
३. कित्ता, पृ. २७.
४. फुले जोतीराव गोविंदराव : 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', संपादक- य. दि. फडके, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पाचवी आवृत्ती, १९९१, पृ. ५७९.
५. वानखेडे चंद्रकांत : 'साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे', संकेत प्रकाशन, प्र.आ. २०१३, पृ. ५४.
६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : 'लेखण आणि भाषणे', खंड-१८, भाग-१, १९२० ते १९५६, महाराष्ट्र शासन, प्र.आ. २००२, पृ. ५३७.
७. कित्ता, पृ. ४४६.
८. डॉ. वाघमारे सुरेश : 'आंबेडकरी चळवळ व मातंग समाज'.
९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : 'लेखण आणि भाषणे', खंड-१८, भाग-३, पृ. २७७.
१०. कित्ता, पृ. २७८.
११. वानखेडे चंद्रकांत : 'साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे', संकेत प्रकाशन, प्र.आ. २०१३, पृ. ४८.



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani